क्र.पोअगो/कक्ष-१२/फोर्स वन प्रतिनियुक्ती-परिपत्रक/२०२२ 7694
पोलीस अधिक्षक गोंदिया यांचे कार्यालय,
पतंगा मैदान, फुलचुर ता.व जि.गोंदिया
पिन - ४४१६०१.
दिनांक :- 23 /११/२०२२.

---

:: परिपत्रक ::

**विषय : फोर्स वन दलामध्ये पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांची प्रतिनियुक्तीने नेमणुकीबाबत**

**संदर्भ : अपर पोलीस महासंचालक फोर्स वन म.रा. मुंबई यांचे अर्धशासकीय पत्र क्र. २०२२/१३४ दिनांक ०६/१०/२०२२.**

---oooo---

उपरोक्त संदर्भिय फोर्स वन दलामध्ये पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांची प्रतिनियुक्तीने नेमणुकीबाबतचे अपर पोलीस महासंचालक फोर्स वन म.रा. मुंबई यांचे अर्धशासकीय पत्रासह प्राप्त माहिती यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

२६ नोव्हेंबर २००८ (२६/११) रोजी मुंबई वर झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सुरक्षा दलातील धडक कृती दलाच्या (एन.एस.जी.-५१) धरतीवर फोर्स वन दलाची स्थापना करण्यात आली आहे.

फोर्स वन पथकामध्ये राज्य राखीव पोलीस बल व इतर पोलीस घटकातील तरुण तडफदार अधिकारी व अंमलदार यांची प्रतिनियुक्तीवर नेमणुक करण्यात येते. महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील जास्तीत जास्त तरुण अधिकारी व अंमलदार यांची फोर्स वन पथकात नेमणुक व्हावी याकरीता फोर्स वन पथकात नेमणुक विषयी व फोर्स वन दलामध्ये मिळणाऱ्या सुविधा यांची माहिती अर्धशासकीय पत्रासह प्राप्त झाली असुन सदरची माहिती घटक स्तरावर पोलीस परिपत्रक, कार्यालयीन आदेश इत्यादि मार्फत सर्व अधिकारी व अंमलदार यांना देण्यास निर्देशित केले आहे.

त्यानुषंगाने अर्धशासकीय पत्रासह प्राप्त झालेली फोर्स वन पथकात नेमणुक विषयी व फोर्स वन दलामध्ये मिळणाऱ्या सुविधा याविषयीची माहिती सदर परिपत्रकाव्दारे गोंदिया जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गोंदिया जिल्हयाचे संकेतस्थळावर अपलोड करुन निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

**सहपत्र :** फोर्स वन पथकात नेमणुक विषयी माहिती प्रत.
**(मा. पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

**(संतोष ना. गेडाम)**
कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक गोंदिया करीता.

प्रति,
प्रभारी अधिकारी, सायबर सेल गोंदिया
२/- सदरचे परिपत्रक व त्यासोबतची माहिती गोंदिया जिल्हा संकेतस्थळावर अपलोड करुन प्रसिध्द करण्यात यावी.
प्रत : अपर पोलीस अधीक्षक गोंदिया कॅम्प देवरी
प्रत : उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग गोंदिया/तिरोडा/आमगाव/देवरी
प्रत : पोलीस उपअधीक्षक (मुख्या.) गोंदिया
प्रत : १) सर्व प्रभारी अधिकारी पोस्टे गोंदिया जिल्हा
२) सर्व प्रभारी अधिकारी सशस्त्र दुरक्षेत्र, गोंदिया जिल्हा
३) सर्व प्रभारी अधिकारी सी-६० पथक गोंदिया जिल्हा
४) सर्व प्रभारी अधिकारी-शाखा प्रमुख गोंदिया जिल्हा
५) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय गोंदिया ६) प्रभारी अधिकारी पोलीस उपमुख्यालय, देवरी.

1) **<u>नेमणूक कालावधी</u> :-** फोर्स वन दलातील विविध घटकांत पुढीलप्रमाणे कालावधीकरीता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली जाते.

| अ.क्र. | घटक | प्रतिनियुक्ती कालावधी | |
|---|---|---|---|
| | | अधिकारी | अंमलदार |
| 1 | कृती गट | 03 वर्षे | 05 वर्षे |
| 2 | प्रशिक्षण गट | 03 वर्षे | 05 वर्षे |
| 3 | पूरक गट | 03 वर्षे | 05 वर्षे |
| | अ) चालक | 03 वर्षे | 05 वर्षे |
| | ब) आयुधीक | 03 वर्षे | 05 वर्षे |
| | क) बिनतारी संदेश विभाग | 03 वर्षे | 05 वर्षे |
| | ड) कार्यालयीन अंमलदार | 03 वर्षे | 05 वर्षे |

2) **<u>पात्रता :-</u>**

i) **इच्छूकता :-** फोर्स वन दलात काम करणेस इच्छूक असणे अपरिहार्य आहे.

ii) **सेवा अभिलेख :-** सेवा अभिलेख उत्तम असावा.गंभीर शिक्षा/प्राथमिक/विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित नसावी.

iii) **वय :-** फोर्स वन दलातील विविध घटकांत पुढीलप्रमाणे वयोमयर्दिनुसार प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली जाते.

| अ.क्र. | घटक | वयोमर्यादा (जास्तीत जास्त) | |
|---|---|---|---|
| | | अधिकारी | अंमलदार |
| 1 | कृती गट | -- | 28 |
| | अ) पीउनि | 35 | -- |
| | ब) सपोनि/पोनि | 45 | -- |
| 2 | प्रशिक्षण गट | -- | -- |
| 3 | पूरक गट | -- | -- |
| | अ) चालक | 45 | 45 |
| | ब) आयुधीक | 45 | 45 |
| | क) बिनतारी संदेश विभाग | 45 | 45 |
| | ड) कार्यालयीन कर्मचारी | 45 | 45 |

3) **प्रशिक्षण :-**

i) **कृती गट :- सेवा पूर्व :-**

i) 08 आठवडा जी.सी.पी.सी. कोर्स.

ii) 12 आठवडा ए.सी.पी.सी. कोर्स.

iii) सायकोमॅट्रिक्स टेस्ट.

iv) 15 दिवस व्हॅलिडेशन कोर्स.

नमूद परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अधिकारी व कमांडो यांची फोर्स पथकात प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात येते.

**सेवाअंतर्गत :-** फोर्स वन दलात नेमणूक झाल्यावर अधिकारी व कमांडो यांना फोर्स वन अंतर्गत पुढील विविध प्रशिक्षण दिले जाते.

i) बिडीडीडीएस,

ii) स्नायपर,

iii) अॅटीकॅड,

iv) मॅप रिडींग

v) प्रथमोपचार

पात्र अधिकारी व कमांडो यांना विशेष प्रशिक्षणाकरीता भारतातील व भारताबाहेरील विविध महत्वाच्या आस्थापनांमध्ये प्रशिक्षण घेण्याकरीता पाठविले जाते.

ii) **प्रशिक्षण गट :-**

i) फोर्स वन पथकात किमान 05 वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

ii) 16 आठवडयांचा CDI ( Commando Drill Instructor Course) यशस्वीपणे पात्र असणे आवश्यक आहे.

iii) **पूरक गट :-** 03 आठवडयाचे मुलभूत प्रशिक्षण सत्र.

4) **<u>फोर्स वन दलातील अधिकारी व कमांडो यांना देण्यात येणाऱ्या सुविधा</u> -**

i) फोर्स वन दलात नेमणूक झालेल्या अधिकारी व कमांडो यांना मूळ वेतनाचे पुढीलप्रमाणे वेतन विशेष प्रोत्साहनपर भत्ता म्हणून दिला जातो.

| अ.क्र. | घटक | प्रोत्साहनपर भत्ता |
|---|---|---|
| 1 | कृती गट | मूळवेतनाच्या 100 % |
| 2 | प्रशिक्षण गट | मूळवेतनाच्या 50 % |
| 3 | पूरक गट | मूळवेतनाच्या 25 % |

ii) फोर्स वन पथकामध्ये सलग 02 वर्ष सेवा कालावधी पूर्ण करणाऱ्या अधिकारी व कमांडो यांना विशेष सेवा पदक प्रदान करुन गौरव केला जातो.

iii) फोर्स वन पथकामध्ये अधिकाऱ्यांनी 02 वर्ष कालावधी व कमांडो यांनी 05 वर्ष उत्कृष्टरीत्या पूर्ण केल्यास त्यांचा प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येते.

iv) विवाहित अधिकारी व कमांडी यांना फोर्स वन मुख्यालयामध्ये राहणेकरीता 2 बीएचके शासकिय निवासस्थान देण्यात येते.

v) जे अधिकारी व कमांडी बॅचलर आहेत अशा अधिकारी व कमांडी यांना राहण्यासाठी मुख्यालयामध्ये सर्व सोयीसुविधायुक्त रुम उपलब्ध आहेत.

vi) अधिकारी व कमांडी यांना उच्च दर्जाची मेस उपलब्ध आहे.

vii) फोर्स वन मुख्यालयामध्ये 24 तास अद्ययावत जीम उपलब्ध आहे.

viii) फोर्स वन मुख्यालयामध्ये 24 तास अभ्यासिका/वाचनालय उपलब्ध आहे.

ix) फोर्स वन मुख्यालयामध्ये फिजीयोथेरपिस्ट भेट देवून अधिकारी व कमांडी यांचे शारिरीक व्यायाम करुन घेतात.

x) फोर्स वनमधील जे अधिकारी व कमांडी अखिल भारतीय पोलीस स्पर्धामध्ये सहभाग घेतात व पारितोषिक मिळवतात त्यांचा गौरव केला जातो.

xi) अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन यांची दर आठवडयाला साप्ताहिक बैठक व मासिक दरबार आयोजन केले जाते. यात कमांडोच्या अडचणींचे निवारण केले जाते.

xii) फोर्स वन दलामध्ये दर तीन महिन्यामध्ये तिमाही पीपीटी, बीपीईटी, बीओएसी व फायरींग परिक्षा घेतल्या जात असून त्यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकविण्याऱ्या अधिकारी व कमांडी यांचा पदक, चषक व बक्षीस देवून गौरव केला जातो.